Netlink Solutions (India) Ltd.
507, Laxmi Plaza, Laxmi Industrial Estate,
New Link Road, Andheri (W), Mumbai - 400 053.
Tel : 91-22- 26335583, 26335584
Email : netlink@easy2source.com
Website : www.nsil.co.in
CIN NO : L45200MH1984PLC034789

September 06, 2018

Department of Corporate Services
BSE Limited
Phirojee Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Fort
Mumbai– 400 001

Re: - **Sub: Compliance under Regulation 47 and Regulation 30(2) read with Schedule III of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015**

**Ref: Newspaper Advertisements regarding Notice of the 33rd Annual General Meeting (AGM), Remote e-voting and Notice of Book Closure**

Dear Sir,

Pursuant to Regulation 30(2) read with Clause 12 of Para A Part A of Schedule III of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, please find enclosed copies of Newspaper advertisements published on September 6, 2018, in Business Standard [all India editions] (in English) and Lakhwadeep (in Marathi), in compliance with the Regulation 47 of the SEBI Listing Regulation and Companies Act, 2013 with respect to the below:

i. Thirty Third Annual General Meeting of the Company scheduled to be held on 29th September, 2018;
ii. Particulars of Remote e-voting for the AGM; and
iii. Notice of Book Closure under section 91 of the Companies Act, 2013.

Kindly take the same on record.

The newspaper advertisements may also be accessed on the website of the Company at the www.nsil.co.in

Kindly note the same and acknowledge the receipt.

Thanking you,
Yours truly,
**For Netlink Solutions (India) Limited,**

RUPA MINESH MODI

Digitally signed by RUPA MINESH MODI
DN: cn=RUPA MINESH MODI, c=IN, st=Maharashtra, o=Personal, serialNumber=6206a667240285abd81daf8fe0bb1de731d0c0375b1328967ed97ccd0c5f264e
Date: 2018.09.06 16:12:48 +05'30'

**Rupa Modi**
**Executive Director and CFO**
**(DIN No: 00378383)**
**Enclosure – Copy of Notice**

# शहरातील खराब रस्त्यांमुळे अंगदुखीचा त्रास

## नगरसेवकाने आयुक्तांना दिले रॅली स्प्रे आणि झंडू बाम

**उल्हासनगर, दि.५:** उल्हासनगर शहरातील सर्वच रस्ते खराब असल्यामुळे वाहनचालकांची हाडे खिळखिळी झाली आहेत आणि त्यामुळे अंगदुखीचा त्रास लोकांना होत असल्याचा आरोप नगरसेवक मनोज लासी यांनी आज सर्वसाधारण सभेत केला. खराब रस्त्यांना मनपा प्रशासन जबाबदार असल्याचे सांगून लासी यांनी मनपा आयुक्त गणेश पाटील यांना रॅली स्प्रे आणि झंडू बाब भेट दिली. आजच्या सर्वसाधारण सभेला सुरुवात होताच नगरसेवक मनोज लासी यांनी शहरातील खराब रस्त्यांचा मुद्दा उपस्थित केला . शहरातील जवळजवळ सर्वच रस्ते खराब आहेत त्यात काही रस्ते तर नुकतेच बनविले गेले आहेत त्या रस्त्यांवर देखील खड्डे निर्माण झाले आहेत . रस्त्यांच्या खड्ड्यांवर जवळपास १४ करोड रुपये खर्च झाले असून अजूनही खड्डे बुजविले गेले नाहीत.



नुकताच चालीया हा सिंधी भाषिकांचा सण साजरा करण्यात आला त्यापूर्वी शहरातील खड्डे बुजविले जातील असे आश्वासन प्रशासनाने दिले होते मात्र आता गणेशोत्सव देखील जवळ आला आहे तरी खड्डे बुजविले गेले नाहीत असा आरोप करीत मनोज लासी यांनी खड्डे बुजविण्याचे कंत्राट ज्या कंपन्यांना दिले आहेत त्या झा पी आणि जयभारत या कंपन्यांना काळ्या यादीत टाकण्याची मागणी देखील लासी यांनी केली. शिवसेना नगरसेवक धनंजय बोडारे यांनी देखील प्रशासनावर या संदर्भात जोरदार टीका केली तसेच महापौर मीना आयलानी आणि उपमहापौर जीवन इदनानी यांना देखील खडे बोल सुनावले.

### खड्डे बुजविण्याच्या कंत्राटीची सखोल चौकशी होणार

१४ करोड खर्च करून देखील खड्डे बुजविले गेले नाहीत याबाबत सभागृहात आश्चर्य व्यक्त करण्यात आले असून या प्रकरणी एक चौकशी समिती स्थापन केली गेली आहे यात नगरसेवक जमनु पुरुसवाणी, मनोज लासी , राजेश वधारीया, धनंजय बोडारे महापौर मीना आयलानी उपमहापौर जीवन इदनानी आणि आयुक्त गणेश पाटील यांचा समावेश आहे .

### तरूणाच्या हत्याप्रकरणी

# २ जणांना उत्तरप्रदेशातून अटक



**उल्हासनगर दि.५ :** बोळीमध्ये लघुशंका करताना हटकल्याने त्याचा राग मनात धरून ३ जणांच्या टोळीने तरूणाला चाकुने भोसकून त्याची हत्या केल्याची घटना उल्हासनगरात १ आठवडयापूर्वी घडली होती. या प्रकरणी एका आरोपीला पोलिसांनी त्वरीत अटक केली होती. फरार झालेल्या २ जणांना उत्तरप्रदेशातील गोरखपूर परिसरातून झडप घालून अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. मिळालेल्या माहितीनूसार शहरातील कॅम्प नं. २ येथील खेमाणी परिसरात कारा हॉल जवळ सेल्समॅन चंद्रकांत देविदास मोरे(२९) हा तरूण राहतो.

सायंकाळच्या सुमारास चंद्रकांत तो त्याच्या मित्रासोबत मच्छीमार्केट परिसरात उभा असताना त्याठिकाणी नितीन चौधरी हा तरूण रस्त्यावरील गल्लीतील बोळीमध्ये लघुशंका करीत होता. चंद्रकांत याने त्याला येथे लघुशंका का करतो? याबाबत हटकले. त्या कारणावरून चंद्रकांत याचे नितीन व त्याचे मित्र सुनिल प्रजापती व रवि जैस्वार याच्यासोबत वाद होऊन भांडण झाले होते. त्याचा राग त्या तिघांना आला होता. याच रागाच्या भरात तिघांनीही चंद्रकांतची चाकु भोसकून त्याची हत्या केली होती. त्या गुन्हयातील तिघांपैकी रवि जैस्वार याला झडप घालून हनुमानगर परिसरातून पोलिसांनी अटक केली होती. तर त्या गुन्हयातील सुनील व नितीन हे दोघे फरार झाले होते. पोलिसांनी उत्तरप्रदेशात जाऊन गोरखपूर येथे लपून बसलेल्या सुनील उर्फ टक्का प्रजापती(२०), नितीन चौधरी(२०) या दोघांना झडप घालून ताब्यात घेतले.




### सरकारच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी

# भाजपा ओबीसी मोर्चाचे 'संपर्क से संवाद' अभियान

**कल्याण , दि. ५ :** भारतीय जनता पार्टीची ओबीसी मोर्चा महायात्रा कल्याणमध्ये दाखल झाली असून या यात्रेच्या माध्यमातून केंद्र आणि आणि राज्य सरकारच्या योजना सर्व सामन्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी संपर्क से संवाद और संवाद से सेवा हे अभियान राबविण्यात येत असल्याची माहिती भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश अध्यक्ष विजय चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ओबीसी मोर्चाचे महासचिव प्रशांत पाटील, प्रदेश सचिव मनीषा केदार, सुनिता राठोड, ॲड. उज्वला पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

केंद्रात नरेंद्र मोदी व राज्यात देवेंद्र फडवणीस सरकार गेल्या ४ वर्षांपासून सामान्य जनतेचा आलेख उंचावण्यासाठी प्रयत्न करत आहे. सरकारने सामान्य जनतेच्या हिताच्या अनेक योजना कार्यान्वित केल्या असून त्या जनतेपर्यंत घेऊन जाण्यासाठी पदाधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न करावेत. विदर्भ व मराठवाड्यांचा प्रवास संपवून भाजपा ओबीसी मोर्चाच्या संवाद से संपर्क या अभियानाचा कोकण प्रवास सुरू झाला आहे. ओबीसी मोर्चाला बुथ स्तरापर्यंत घेवून जावे लागणार आहे. त्यासाठी पदाधिकाऱ्यांनी स्थानिक भाजपा नेतृत्वाच्या मार्गदर्शनाखाली काम करावे. येत्या काळात संबंधीत समाजाच्या समस्या व मागण्यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपाचे प्रदेश अध्यक्ष रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत चर्चा होणार असल्याची माहिती विजय चौधरी यांनी यावेळी दिली.

# रस्त्यांवरील खड्डयांमुळे नागरीक हैराण

**उल्हासनगर, दि. ४ :** गणपतीच्या आगमनाला काहीच दिवस उरले असून अद्यापपर्यंत शहरातील रस्त्यांवरील खड्डे मनपाने बुजविले नसून त्वरीत हे खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी आगरी सेना ठाणे जिल्हा प्रमुख विठ्ठल जोशी यांनी केली आहे.

उल्हासनगर शहरातील कॅम्प नं. ४ परिसरातील १७ सेक्शन, पेन्सील फॅक्ट्री परिसर, कल्याण-अंबरनाथ रोड, उल्हास स्टेशन रोड, शिवमंदीर रोड, भाटीया चौक या मुख्य रहदारीच्या रस्त्यांची चाळणी झाली आहे. दरवर्षी महापालिका रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी लाखो रूपये खर्च करते पण रस्त्यांची अवस्थता जैसी थी वैसीच. पावसाळा सुरू होण्याआधी जुलै महिन्यात महापालिकेने घाईघाईत शहरातील खड्डे बुजविले होते.

पण मुसळधार पडलेल्या पावसामुळे खड्डयात टाकलेले भरणा वाहून गेल्याने पुन्हा खड्डे दिसू लागले आहेत.

पुढल्या आठवडयात गणरायाचे आगमन होणार आहे त्याआधी रस्त्यांवरील खड्डे बुजविणे गरजेचे असून अद्याप पर्यंत खड्डे न बुजविल्याने गणपती आणताना नागरीकांना या खड्डयांचा त्रास सहन करावा लागणार आहे. मनपाने शहरातील मुख्य रस्त्यांवर पडलेले खड्डे त्वरीत बुजवावे अशी मागणी विठ्ठल जोशी यांनी केली आहे.

# मॉर्निंग वॉक : सोन्याची चैन चोरी

**उल्हासनगर दि. ५ :** बदलापुर पुर्व येथील घोरपडे चौक परिसरात सौ.जनाबाई पवार(५९) या राहतात. सकाळी पाहुणे ६ च्या सुमारास त्या मोहनपाम पेंडुलकर हॉल समोरून मॉर्निंग वॉक करीत जात होत्या. त्यावेळी मोटरसायकलवरून आलेल्या २ अनोळखी इसमांपैकी मागे बसलेल्या एकाने सौ.जनाबाई यांच्या गळयातील ३ तोळे ५ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन सुमारे ५२ हजार रूपये किंमतीची जबरीने खेचून तोडून चोरून नेली. अधिक तपास बदलापुर पुर्व पोलिस ठाण्याचे पो.उप.नि.जाधव करीत आहेत.

# भिवंडी महापालिका शिक्षकांच्या रखडणाऱ्या पगाराचा तिढा सुटला

## निरंजन डावखरे यांच्या प्रयत्नांना यश

**ठाणे, दि. ५ : भिवंडी महापालिकेतील ८४८ शिक्षकांच्या दरमहा रखडणाऱ्या पगाराचा तिढा सुटला आहे. कोकण पदवीधर मतदारसंघातील भाजपचे आमदार ॲड. निरंजन डावखरे यांच्या प्रयत्नांनंतर तांत्रिक अडथळे दूर झाले असून, शिक्षकांच्या खात्यात जूनचा पगार जमा झाला आहे.** भिवंडी महापालिका क्षेत्रातील शिक्षकांच्या समस्या सोडविण्यासाठी आमदार डावखरे यांनी भिवंडी महापालिकेत नुकतीच बैठक घेतली होती. या बैठकीला आयुक्त मनोहर हिरे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी, शिक्षक संघटनांचे सुधीर घागस, शाहजहान मौलाना आदींसह शिक्षकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यावेळी शिक्षकांच्या रखडणाऱ्या पगारावर चर्चा झाली होती. त्यावेळी आमदार डावखरे यांनी तांत्रिक अडथळे दूर करण्याचे आश्वासन दिले होते. भिवंडी महापालिकेतील शिक्षकांच्या पगाराची बिले मुंबईतील उपसंचालक कार्यालयात पाठविली जातात. त्यानंतर वांद्रे येथील कोषागार कार्यालयात रवाना होतात. कोषागार कार्यालयातून राज्य सरकारच्या हिस्स्याची रक्कम महापालिकेकडे वर्ग केली जाते. अनेक वेळा बिले सादर करण्यात कालावधी जातो. त्यामुळे या प्रक्रियेत होणारी दिरंगाई दूर करण्याच्या सुचना आमदार डावखरे यांनी केल्या होत्या. त्याची तत्काळ अंमलबजावणी झाल्यानंतर शिक्षकांच्या खात्यात जूनच्या पगाराची रक्कम बुधवारी जमा झाली. तर महापालिकेकडून जूनमधील 'युटीलायझेशन सर्टिफिकेट' सादर केल्यानंतर जुलै व ऑगस्टचा सरकारच्या हिस्स्यातील पगार प्रदान केला जाणार आहे. या निर्णयामुळे महापालिकेच्या शिक्षकांना दिलासा मिळाला आहे.

### अर्ध्या पगारातून मुक्तता!

महापालिकेतील ८४८ शिक्षकांना अर्धा पगार महापालिकेकडून व अर्धा पगार राज्य सरकारकडून अनुदानाच्या स्वरुपात मिळतो. महापालिकेची आर्थिक स्थिती बिकट आहे. त्यात तांत्रिक अडथळ्यांमुळे पगार वेळेत होत नव्हता. बहूसंख्य वेळा केवळ महापालिकेचा हिस्सा जमा होत असे.

त्यामुळे शिक्षकांच्या खात्यात निम्मा पगार जमा होत असे. तर दोन ते तीन महिन्यांनंतर राज्य सरकारच्या हिस्स्याची पगाराची रक्कम मिळत असे. या काळात शिक्षकांचे हाल होत होते. त्याचबरोबर कर्जाचे हप्ते, नवी कर्जे घेण्यास अडचणी येत होत्या. आता तांत्रिक अडथळे दूर झाल्यामुळे शिक्षकांची अर्ध्या पगारातून मुक्तता झाली आहे.

# गणपती आगमनाची मिरवणूक : मनाई आदेशाचे उल्लंघन

### १० जणांविरूध्द गुन्हा

**उल्हासनगर दि. ५ :** पोलिस विभागामार्फत कोणतीही पुर्व परवानगी न घेता गणपतीच्या आगमनाची ढोल ताश्याच्या गजरात मिरवणूक काढून ठाणे पोलिस आयुक्तांच्या मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी मंडळाच्या ७ जणांसह ढोल ताशे वाजविणा-या ३ जणांविरूध्द हिललाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनूसार कॅम्प नं. ५ येथील सेक्शन ३९ परिसरातील जय काली मित्रमंडळाच्या गणपतीच्या आगमनाची मिरवणूक शुक्रवारी रात्रीच्या सुमारास नेताजी चौक मार्गे भाटीया चौकाकडे काढण्यात आली होती. पोलिस विभागामार्फत कोणतीही पुर्व परवानगी न घेता मिरवणूकीचे आयोजन करून ढोल-ताशे पथकाला विनापरवाना वाद्य वाजविण्याचे काम सोपवून मिरवणूक काढून पोलिस आयुक्तांच्या मनाईच्या आदेशाचे उल्लंघन केले. याप्रकरणी पो.शि.विनोद ठाकुर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मंडळाचे अध्यक्ष सुनिल यांच्यासह १० जणांविरूध्द हिललाईन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पो.हवा.कदम करीत आहेत.

# चोरी प्रकरणात नऊ वर्षांनी आरोपीला अटक!

**बदलापूर, दि.५ :** बदलापुरमधील एका बांधकाम व्यावसायिक फार्महाऊसमध्ये चोरी प्रकरणी आरोपी मोहन कृष्णस्वामी केसरकर याला तब्बल ९ वर्षानंतर अटक करण्यात आली असून त्याची रवानगी आधारवाडी कारागृहात करण्यात आली आहे. बदलापूर येथील बांधकाम व्यावसायिक संभाजीराव पवार यांनी कन्याकुमारी बाबुराव सुर्वे यांची काराव व शीळ येथील राहत्या घरासहित पोल्ट्री शेड व अंदाजित सव्वा दोन एकर मोकळी जागा १९९९ मध्ये विकत घेतली होती. कन्याकुमारी सुर्वे यांना पैशाची निकड होती. त्यांनी स्वत पवार यांना विनंती करुन जागा विकली होती.

सदर जमीनीला लागूनच पवार यांची जमीन असल्याने पवार यांनीही सुर्वेसोबत व्यवहार करण्यात उत्सुकता दाखवली होती. त्यानंतर पुढील दहा वर्षे संपूर्ण मालमत्तेचा ताबा पवार यांच्याकडेच होता व त्यांनी तिथे देखभालीसाठी केअरटेकरचीही नेमणूक केलेली होती. मालमत्तेची ग्रामपंचायतीची करपावतीही संभाजी पवार यांच्याच नावे आहे. १९९९ पासून आजतागायत पवार जागेचा नियमित करभरणा करीत आले आहेत. पवारांचं स्वतचं वास्तव्य बदलापुरात शहरात आहे. मध्यंतरीच्या काळात पवारांची मुलंच मालमत्तेचा सांभाळ करीत होते.

२८ मे, २००९ रोजी अचानक कन्याकुमारी व तिचे पती मोहन केसरकर यांनी विक्री केलेल्या राहत्या घराचा घरफोडी करुन ताबा घेतला. घरातील सामान चोरी करुन परस्पर विकले. ही बाब पवारांच्या केअरटेकरने त्यांना कळवल्यानंतर पवारांनी कुळगाव पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी पवारांचा अर्ज चौकशीसाठी ठेवून घेतला, पण योग्य पतिसाद दिला नाही. कालांतराने चौकशी करुन पोलिसांनी झाल्या घटनेची खातरजमा केली. सामान विकले गेल्याचेही पोलिसांना कळले. परंतु राजकीय दबावापोटी केसरकरविरोधात गुन्हा दाखल न करता फक्त जबाब घेवून समझोता करार लिहून घेतला. विकी व्यवहारातील रक्कमेची परतफेड करु व घेतलेले सामानही आणून देऊ, असा करार पोलिसांनी करुन घेतला. पण त्याने पवारांचे समाधान झाले नाही. त्यांनी त्याविरोधात मा. उच्च न्यायालयात धाव घेतली.



न्यायालयाने २४ फेब्रुवारी २०११ रोजी मुरबाड उपविभागीय पोलिस अधिकाऱ्याने चौकशी करावी असं आदेश दिले.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांस कलविण्यात येते की गांव मौजे : सुत्रकार, ग्रामपंचयत समिती तलासरी, जिल्हा परिषद हद्दीतील येथील ता. वसई, जिल्हा, पालघर येथील गट नं. ३७२, हि. नं. १/१, क्षेत्र हे.आर. १६.१९.०, पो.ख. १.४०.०, आकारणी ६.६२ सदरची मिळकत ७/१२ च्या उतान्यावर असुन जमिन मालक चंपाबेन चंद्रशंकर जोशी यांच्या मालकी व कब्जेवहीवाटीची आहे. त्यांनी सदर मिलकत ४३ एकर २०गुंठे खुली जमीन साजीद इद्रीस मेमन यांना कामस्वरुपी कायमची विकत देत आहे, तरी सदर मिळकतीवरी कोणाही इसमांचा हक्क, अधिकार किंवा हितसंबंध असेल त्यानी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत सर्व पुराव्यानिशी लेखी शॉप नं. २६, साई बाजार, तुलिंज रोड, नालासोपारा (पूर्व), जि. पालघर ह्या पत्त्यावर कळवावे. अन्यथा तसा कोणाचाही, कोणताही हक्क, अधिकार, किंवा हितसंबंध नाही व असल्यास तो सोडून दिला जाइन असे समजून माझे अशील त्यांचे बरोबर व्यवहार पूर्ण करतील हयाची नोंद घ्यावी.

दि. ०६/०९/२०१८

श्री. संजय वी. सिंह
वकील उच्च न्यायालय

नमुना क्र.७५ **सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बृहन्मुंबई विभाग मुंबई**

धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला,
८३ डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी,
मुंबई-४०००१८

### चौकशीची जाहीर नोटीस

**अर्ज क्रमांक : सधआ- १० / १५७७ / २०१८**
**सार्वजनिक न्यासाचे नाव : " SHREE RAJPARA SHWETAMBER MURTIPUJAK JAIN SANGH "..बाबत.**
**BIPIN P SHAH...अर्जदार.**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, **सहाय्यक धर्मादाय आयुक्त--१०, बृहन्मुंबई विभाग, मुंबई** हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत:-

१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**अ) जंगम मिळकत : रोख रु. १०००/-**
**(अक्षरी रुपये एक हजार फक्त)**
**ब) स्थावर मिळकत : निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०५/०९/२०१८ रोजी दिली.

शिक्का

**सही/-**
**अधीक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, मुंबई**

## उरावी टी ॲन्ड वेज लॅम्प्स् लिमिटेड

शॉप नं. ३२९ ॲव्हीयोर, निर्मल गॅलेक्सी, एल.बी.एस. मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई शहर, महाराष्ट्र - ४०० ०८०, भारत.
सीआयएन : U31500MH2004PLC145760 ई-मेल आयडी : info@uravilamps.com दूरध्वनी : ०२२-६१५६०४०४ वेबसाइट : www.uravilamps.com

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीची १४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) एजीएमच्या सूचनेत विहित विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी **शुक्रवार, दि. २८.०९.२०१८ रोजी स. ११.३० वाजता हॉटेल सितारा, धीरज ॲनेक्स बिल्डिंग, सरोजिनी नायडू रोड, सिद्धार्थ नगर, मुलुंड (प.), मुंबई - ४०० ०८०** येथे आयोजित करण्यात येत आहे. ज्या सभासदांनी आपले ई-मेल आयडीज् कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदवलेले असतील त्यांना एजीएमची सूचना तसेच वित्तीय वर्ष २०१७-१८ करिताच्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती पाठवण्यात आलेल्या आहेत. सदर दस्तावेज कंपनीची वेबसाइट www.uravilamps.com वरही उपलब्ध आहेत. अन्य सर्व सभासदांना एजीएमची सूचना तसेच वित्तीय वर्ष २०१७-१८ करिताच्या वार्षिक अहवालाच्या मंजूर पद्धतीने पाठवण्यात आलेल्या आहेत.
निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. २१.०९.२०१८ रोजीनुसार प्रत्यक्ष स्वरूपातील किंवा डीमटेरियलाइज्ड् स्वरूपातील भागधारक असलेले सभासद एजीएमच्या सूचनेत विहित सामान्य/विशेष विषयांवर एजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून एनएसडीएलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीच्या माध्यमातून (परोक्ष ई-मतदान) मत देऊ शकतील. सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की :

१. एजीएमच्या सूचनेत विहित सामान्य व विशेष विषयांवर इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मतदान करता येऊ शकेल.
२. परोक्ष ई-मतदानाचा कालावधी दि. २४.०९.२०१८ रोजी स. ९.०० वाजता सुरू होईल.
३. परोक्ष ई-मतदानाची समाप्ती दि. २७.०९.२०१८ रोजी सायं. ५.०० वाजता होईल.
४. इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे किंवा एजीएमच्या ठिकाणी मत देण्यासाठीच्या पात्रतेच्या निश्चितीकरिताची निर्धारित अंतिम तारीख दि. २१.०९.२०१८ अशी आहे.
५. एजीएमच्या सूचनेच्या पाठवणीपश्चात एकादी व्यक्ती कंपनीचे शेअर्स संपादन करीत असल्यास व कंपनीची सभासद बनत असल्यास व निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. २१.०९.२०१८ रोजीनुसार भागधारक असल्यास सदर व्यक्तीखालील ई-मेल आयडीज्वर विनंती पाठवून लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल :
   १. info@uravilamps.com
   २. evoting@nsdl.co.in
   ३. joyv@bigshareonline.com

सभासदांनी नोंद घ्यावी की,
ए) वरील निर्देशित तारीख व वेळेपश्चात एनएसडीएलद्वारे परोक्ष ई-मतदानाचे मोड्युल मतदानाकरिता अकार्यरत करण्यात येईल व सभासदाद्वारे ठरावावर एकदा मत दिल्यानंतर त्याला ते बदलण्याची परवानगी नसेल.
बी) एजीएमच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारे मतदानाची परवानगी असेल.
सी) एजीएमच्या आधी ज्या सभासदांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे मत दिलेले असतील तेसुद्धा एजीएममध्ये उपस्थित राहू शकतील परंतु त्यांना पन्हा मत देता येणार नाही.
डी) निर्धारित अंतिम तारखेनुसार ज्या व्यक्तीचे नाव सभासदांचे रजिस्टर किंवा डिपॉझिटरीजद्वारे तयार करण्यात आलेल्या लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद असेल अशा व्यक्ती परोक्ष ई-मतदान तसेच एजीएमच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.

एजीएमची सूचना कंपनीची वेबसाइट www. ww.uravilamps.com वर तसेच एनएसडीएलची वेबसाइट www.evoting.nsdl.com वरही उपलब्ध आहे व काही शंका असल्यास सभासदांनी www.evoting.nsdl.com च्या downloads section वर उपलब्ध सभासदांकरिताचे Frequently Asked Questions (FAQs) व सभासदांकरिताचे e-voting user manual वाचावे किंवा कु. अदिती अमित कमलाकर, कंपनी सचिव त्यांचा ई-मेल आयडी info@uravilamps.com येथे संपर्क साधावा.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे
सही/-
श्री. नीरज गडा
व्यवस्थापकीय संचालक व सीएफओ
डीआयएन : ००५१५९३२

दिनांक : ०५.०९.२०१८
ठिकाण : मुंबई

## परनामी क्रेडिट्स लिमिटेड

१०१, अमीर इंडस्ट्रियल इस्टेट, सन मिल कम्पाऊंड, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३.
सीआयएन : L65910MH1993PLC302405 ई-मेल आयडी : parnamilimited@gmail.com वेबसाइट : parnamicredits.in

**सूचना**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीची २५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) एजीएमच्या सूचनेत विहित विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी **शनिवार, दि. २९.०९.२०१८ रोजी १०१, अमीर इंडस्ट्रियल इस्टेट, सन मिल कम्पाऊंड, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३** येथे आयोजित करण्यात येत आहे. ज्या सभासदांनी आपले ई-मेल आयडीज् कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदवलेले असतील त्यांना एजीएमची सूचना तसेच वित्तीय वर्ष २०१७-१८ करिताच्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती पाठवण्यात आलेल्या आहेत. सदर दस्तावेज कंपनीची वेबसाइट parnamicredits.in वरही उपलब्ध आहेत. अन्य सर्व सभासदांना एजीएमची सूचना तसेच वित्तीय वर्ष २०१७-१८ करिताच्या वार्षिक अहवालाच्या प्रत्यक्ष पद्धतीने पाठवण्यात आलेल्या आहेत व ई-मेलद्वारे वार्षिक अहवालाची पाठवणी दि. ०५.०९.२०१८ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.
निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. २२.०९.२०१८ रोजीनुसार प्रत्यक्ष स्वरूपातील किंवा डीमटेरियलाइज्ड् स्वरूपातील भागधारक असलेले सभासद एजीएमच्या सूचनेत विहित सामान्य/विशेष विषयांवर एजीएमच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून एनएसडीएलच्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीच्या माध्यमातून (परोक्ष ई-मतदान) मत देऊ शकतील. सर्व सभासदांना सूचित करण्यात येत आहे की :

१. एजीएमच्या सूचनेत विहित सामान्य व विशेष विषयांवर इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मतदान करता येऊ शकेल.
२. परोक्ष ई-मतदानाचा कालावधी दि. २५.०९.२०१८ रोजी (स. ९.०० वा.) सुरू होईल.
३. परोक्ष ई-मतदानाची समाप्ती दि. २८.०९.२०१८ रोजी (सायं. ५.०० वा.) होईल.
४. इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे किंवा एजीएमच्या ठिकाणी मत देण्यासाठीच्या पात्रतेच्या निश्चितीकरिताची निर्धारित अंतिम तारीख दि. २२.०९.२०१८ अशी आहे.
५. एजीएमच्या सूचनेच्या पाठवणीपश्चात एकादी व्यक्ती कंपनीचे शेअर्स संपादन करीत असल्यास व कंपनीची सभासद बनत असल्यास व निर्धारित अंतिम तारीख अर्थात दि. २२.०९.२०१८ रोजीनुसार भागधारक असल्यास सदर व्यक्ती evoting@nsdl.co.in या ई-मेल आयडीवर किंवा जारीकर्ता/आरटीए यांना विनंती पाठवून लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल.
६. कंपनीचे सभासदांचे रजिस्टर व शेअर ट्रान्सफर बुक्स दि. २२.०९.२०१८ पासून दि. २९.०९.२०१८ पर्यंत बंद राहतील.

सभासदांनी नोंद घ्यावी की,
ए) वरील निर्देशित तारीख व वेळेपश्चात एनएसडीएलद्वारे परोक्ष ई-मतदानाचे मोड्युल मतदानाकरिता अकार्यरत करण्यात येईल व सभासदाद्वारे ठरावावर एकदा मत दिल्यानंतर त्याला ते बदलण्याची परवानगी नसेल.
बी) एजीएमच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारे मतदानाची परवानगी असेल.
सी) एजीएमच्या आधी ज्या सभासदांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे मत दिलेले असतील तेसुद्धा एजीएममध्ये उपस्थित राहू शकतील परंतु त्यांना पन्हा मत देता येणार नाही.
डी) निर्धारित अंतिम तारखेनुसार ज्या व्यक्तीचे नाव सभासदांचे रजिस्टर किंवा डिपॉझिटरीजद्वारे तयार करण्यात आलेल्या लाभार्थी मालकांच्या रजिस्टरमध्ये नोंद असेल अशा व्यक्ती परोक्ष ई-मतदान तसेच एजीएमच्या ठिकाणी मतपत्रिकेद्वारे मतदान करण्यास पात्र असतील.

एजीएमची सूचना कंपनीची वेबसाइट www. parnamicredits.inda तसेच एनएसडीएलच्या वेबसाइटवरही उपलब्ध आहे व काही शंका असल्यास सभासदांनी **www.evoting.nsdl.com** च्या downloads section वर उपलब्ध सभासदांकरिताचे Frequently Asked Questions (FAQs) व सभासदांकरिताचे e-voting user manual वाचावे किंवा **दूर. क्र. १८००-२२२-९९०** वर संपर्क साधावा किंवा कु. प्रतीक्षा परमार, कंपनीच्या कंपनी सचिव यांना **१०१, अमीर इंडस्ट्रियल इस्टेट, सन मिल कम्पाऊंड, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३** येथे संपर्क साधावा ज्यासुद्धा इलेक्ट्रॉनिक साधनांद्वारे मतदानाशी संबंधित तक्रारींचे निवारण करतील.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे
सही/-
रचना सिनगी
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ००१६६५०८

दिनांक : ०५.०९.२०१८
ठिकाण : नवी मुंबई

## नेटलिंक सोल्युशन्स (इंडिया) लिमिटेड

**सीआयएन:** एल४५२००एमएच१९८४पीएलसी०३४७८९
**नोंद.कार्यालय:** ५०७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, न्यु लिंक रोड, अंधेरी (प.), मुंबई-४०००५३, महाराष्ट्र. **दूर.:** ०२२-२६३३५५८३
**ई-मेल:** netlink@easy2source.com **वेबसाईट:** www.nsil.co.in

**३३वी वार्षिक सर्वसाधारण सभा, रिमोट ई-वोटिंग व पुस्तक बंद करण्याची सूचना**

येथे सूचना देण्यात येत आहे की, कंपनीच्या सदस्यांची ३३वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार २९ सप्टेंबर, २०१८ रोजी स.९.00वा. कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय ५०७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, न्यु लिंक रोड, अंधेरी (प.), मुंबई-४०००५३ या ठिकाणी सन २०१७-२०१८ करिता वार्षिक अहवालासह सदस्यांना पाठविण्यात आलेल्या एजीएम सूचना आणि ई-वोटिंग प्रक्रियेत नमूद व्यवसायावर विमर्श करण्याकरिता होणार आहे आणि वितरणाची प्रक्रिया ४ सप्टेंबर, २०१८ रोजी पूर्ण करण्यात आली आहे.

सदस्यांना विहित पद्धतीने त्यांच्या नोंद पत्त्यावर वार्षिक अहवाल पाठविण्यात आलेला आहे. सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी त्यांचा ई-मेल कंपनी/कंपनीचे निबंधक व हस्तांतरण प्रतिनिधी ॲड्रॉईट कॉर्पोरेट सर्विसेस प्रा.लि.कडे नोंद करावा जेणेकरून वार्षिक अहवाल विद्युत स्वरुपाने पाठविता येईल.

येथे सूचना देत आहे की, कंपनी कायदा २०१३ च्या कलम ९१ सहवाचिता कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) अधिनियम, २०१४ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ४२ नुसार ३३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेनिमित्त सोमवार २४ सप्टेंबर, २०१८ ते शनिवार २९ सप्टेंबर, २०१८ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत कंपनीचे सदस्य नोंद पुस्तक, लाभार्थी मालकांचे नोंद पुस्तक व भाग हस्तांतरण पुस्तक बंद ठेवण्यात येतील.

कंपनी कायदा २०१३ च्या कलम १०८ सहवाचिता कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) अधिनियम, २०१४ च्या नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ४४ नुसार सूचित करण्यात येत आहे की, एजीएमच्या सूचनेत नमुद सर्व ठरावांवर मत देण्यासाठी विद्युत स्वरूपाने अर्थात रिमोट ई-वोटिंगने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल)ची कंपनीने सुविधा दिलेली आहे. आवश्यक तपशील खालीलप्रमाणे:

१. २२ सप्टेंबर, २०१८ रोजी वास्तविक किंवा डिमॅट स्वरूपात भागधारणा असणाऱ्या सदस्यांना एजीएममध्ये मतदान किंवा रिमोट ई-वोटिंगने मतदानाची सुविधा दिलेली आहे.
२. रिमोट ई-वोटिंग कालावधी २५ सप्टेंबर, २०१८ रोजी स.९.00वा प्रारंभ होईल.
३. रिमोट ई-वोटिंग कालावधी २८ सप्टेंबर, २०१८ रोजी सायं.५.00वा समाप्त होईल आणि तद्नंतर रिमोट ई-वोटिंग बंद केले जाईल.
४. एजीएम सूचना वितरणानंतर जर कोणी व्यक्ती कंपनीचा सदस्य झाला असल्यास आणि/किंवा निश्चित तारीख २२ सप्टेंबर, २०१८ रोजी भागधारणा घेतली असल्यास त्यांनी evoting@nsdl.co.in किंवा netlink@easy2source.com वर विनंती पाठवून लॉगिनआयडी व पासवर्ड प्राप्त करावा. तथापि ई-वोटिंगकरिता एनएसडीएलसह यापूर्वीच नोंद असल्यास त्यांनी ई-वोटिंगने मत देण्यासाठी विद्यमान युजर आयडी व पासवर्ड वापरावा.
५. एजीएमच्या ठिकाणी बॅलेट पेपरची सुविधा उपलब्ध असेल. रिमोट ई-वोटिंगने मत न देणारे सभेत उपस्थित सदस्यांना सभेत मतदानाचा अधिकार असेल.
६. एजीएमची सूचना कंपनीच्या www.nsil.co.in वेबसाईटवर, बीएसईच्या वेबसाईटवर व एनएसडीएलच्या www.evoting.nsdl.com वेबसाईटवर उपलब्ध आहे.

विद्युत स्वरुपाने मतदानाबाबत काही प्रश्न/तक्रारी असल्यास सदस्य/लाभार्थी मालकांनी कृपया संपर्क श्री. मिनेश मोदी, नेटलिंक सोल्युशन (इंडिया) लिमिटेड, ५०७, लक्ष्मी प्लाझा, लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, न्यु लिंक रोड, अंधेरी (प.), मुंबई-४०००५३, दूर.: ९१-२२-२६३३५५८३/२६३३५५८४, ईमेल: netlink@easy2source.com

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
सही/-
श्री. मिनेश मोदी
पूर्ण वेळ संचालक

दिनांक: ०६.०९.२०१८
ठिकाण: मुंबई

## MAPRO INDUSTRIES LIMITED

ICIN: L70101MH1973PLC020670I
**Regd. Office:** 505, Corporate Corner, 5th Floor, Sunder Nagar, Malad (W), Mumbai - 400 064
**Tel No:** 91-22-28725764; **Email Id:** info@maproindustries.com;
**website:** www.maproindustries.com

**NOTICE OF 46th ANNUAL GENERAL MEETING AND E-VOTING INFORMATION**

**NOTICE** is hereby given that the **ANNUAL GENERAL MEETING** of the Members of MAPRO INDUSTRIES LIMITED will be held on Friday, September 28, 2018 at 11:30 A.M. at 505, Corporate Corner, Sunder Nagar, Malad (West), Mumbai – 400064 to transact the business as set out in the Notice sent to the Members.

**NOTICE** is hereby further given that pursuant to section 91 of the Companies Act, 2013 and Regulation 42 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015, the Register of Members and Share Transfer Books of the Company will be closed from 27th September, 2017 to 28th September, 2018(both days inclusive).

Further it is informed that pursuant to the provisions of Section 108 of Companies Act, 2013 read with Rule 20 of Companies (Management and Administration) Rules, 2014, as amended, and Regulation 44 of SEBI (Listing Obligations & Disclosure Requirements) Regulations, 2015 the Company is providing its members facility to exercise their right to vote using an electronic voting system from a place other than the venue of the meeting ("remote e-voting"). The company has engaged the services of Central Depository Services (India) Limited ("CDSL") as the Agency to provide e-voting facility.

The communication relating to remote e-voting alongwith a copy of the Notice convening the meeting has been dispatched to the members. The Notice of the meeting is available on the website of the company at www.maproindustries.com and on the website of CDSL at www.evotingindia.com.

**The remote e-voting facility shall commence on September 25, 2018 from 9.00 a.m. (IST) and end on September 27, 2018 at 5.00 p.m. (IST). The remote e-voting shall not be allowed beyond the said date and time.**

**A person, whose name appears in the register of Members/Beneficial owners as on the cut-off date i.e September 21, 2018 only shall be entitled to avail the facility of remote e-voting as well as voting at the meeting.**

Any person who becomes member of the company after the dispatch of the Notice of the meeting and holding shares as of the cut-off date i.e. September 21, 2018, may obtain the User ID and password by sending request at **busicomp@gmail.com**. The detailed procedure for obtaining User ID and password is also provided in the Notice of the meeting which is available on Company's website. If the member is already registered with CDSL for e-voting the he can use his existing user ID and password for casting the vote through remote e-voting.

The facility for voting through polling paper shall be made available at the meeting and the members attending the meeting who have not cast their vote by remote e-voting shall be able to vote at the meeting through polling paper.

The members who have cast their vote by remote e-voting may attend the meeting but shall not be entitled to cast their vote again.

In case of any queries/ grievances relating to voting by electronic means, the Members/ Beneficial owners may contact at the following address:

Ms. Purva Shah – Director, Purva Sharegistry India Pvt Ltd,
9 Shiv Shakti Industrial Estate,J R Boricha Marg, Lower Parel (East),Mumbai- 400011,
Phone No: 022-23012518; e-mail : busicomp@gmail.com

**By Order of the Board of Directors**
**Sd/-**
**Nidhi Rateria**
**Company Secretary**
**M.No: A32803**

Place: Kolkata
Date: September 05, 2018